Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

दैनिक
जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६ । वर्ष १ । अंक ९ । पाने २।

DIGITAL EDITION

आरसीबीची एलएसजीवर ५ गडी राखून दमदार मात

(पान २ वर)

Selected

इस्रायल-लेबनॉन यांच्यात दहा दिवसांचा शस्त्रसंधी

अमरावती : इस्रायल आणि लेबनॉन यांच्यात १० दिवसांचा शस्त्रसंधी झाल्याची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी केली. अनेक दशकांनंतर वॉशिंग्टनमध्ये दोन्ही देशांमध्ये पहिल्यांदाच थेट चर्चा झाली होती. अमेरिका व इराण यांच्यात इस्लामाबादमध्ये होणाऱ्या प्रस्तावित शांतता चर्चेसाठी हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. लेबनॉनमध्ये इस्रायल आणि इराण समर्थित हेझबोला या दहशतवादी गटात महिनाभरापेक्षा जास्त काळ संघर्ष सुरू आहे. इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेत्यानाहू आणि लेबनॉनचे अध्यक्ष जोफे औन यांच्याशी उत्तम चर्चा झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे ट्रम्प यांनी समाजमाध्यमावर स्पष्ट केले. उच्चस्तरीय बैठकीसाठी ट्रम्प यांनी या दोन्ही देशाच्या प्रमुखांना व्हाईट हाऊसमध्ये आमंत्रित केले आहे. दरम्यान, पाकिस्तानचे लष्करप्रमुख असिम मुनीर यांनी तेहरानमध्ये इराणी पार्लमेंटचे सभापती मोहम्मद बघेर घालीबाफ यांच्याशी चर्चा केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार

उद्योग क्षेत्रात नवे पर्व सुरु!

श्याम स्टील व जेडब्ल्यू ग्लोबलकडून मोठे करार; रोजगारनिर्मितीला चालना

जन सम्राट टाईम्स

मुंबई : राज्यात उद्योगस्नेही वातावरण, सुटसुटीत प्रक्रिया आणि धोरणात्मक सुधारणा यामुळे महाराष्ट्रात उद्योगांचे नवे पर्व सुरू झाले असून, श्याम स्टील आणि जेडब्ल्यू ग्लोबल उद्योग समूहाने तब्बल १ लाख ७५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. या गुंतवणुकीमुळे राज्यात हजारो रोजगारनिर्मिती होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. वर्षा निवासस्थानी आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत राज्याच्या उद्योग विभागासोबत या दोन्ही उद्योग समूहांनी सामंजस्य करार (MoU) केले. या बैठकीला उद्योग विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच संबंधित कंपन्यांचे पदाधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, राज्य सरकारने उद्योगांसाठी अनुकूल वातावरण तयार करण्यासाठी विविध धोरणात्मक बदल केले आहेत. गुंतवणूकदारांना उद्योग सुरू करण्यासाठी लागणारी प्रक्रिया अधिक सुलभ करण्यात आली आहे. त्यामुळेच जागतिक दर्जाचे उद्योग समूह महाराष्ट्राकडे आकर्षित होत आहेत. जेडब्ल्यू ग्लोबलकडून १.६५ लाख कोटींची गुंतवणूक जेडब्ल्यू ग्लोबल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनी राज्यात सुमारे १ लाख ६५ हजार कोटींची गुंतवणूक करणार आहे. यामध्ये ग्रीन हायड्रोजन प्रकल्प, शाश्वत कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) कॅम्पस, डेटा सेंटर तसेच स्मॉल मॉड्युलर न्यूक्लिअर रिॲक्टर यांसारख्या अत्याधुनिक क्षेत्रांचा समावेश आहे. सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरण परिसरात फ्लोटिंग सोलर पावर आणि एनर्जी स्टोरेज प्रकल्प उभारण्यात येणार असून त्यासाठी १४ हजार ९७६ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. या प्रकल्पातून सुमारे ५०० कायमस्वरूपी रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

एकूणच जेडब्ल्यू ग्लोबलच्या गुंतवणुकीतून राज्यात सुमारे ३ हजार रोजगार उपलब्ध होतील. श्याम स्टीलचा चंद्रपूरमध्ये मोठा प्रकल्प पश्चिम बंगालमधील श्याम स्टील उद्योग समूह चंद्रपूर जिल्ह्यातील गोडपिंपरी येथे १० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करून स्टील प्रकल्प उभारणार आहे. या प्रकल्पातून सुमारे ८ हजारांहून अधिक रोजगार निर्माण होणार आहेत.राज्यातील विविध भागांमध्ये उद्योगांची उभारणी झाल्याने स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध होणार असून ग्रामीण व निमशहरी भागाचा विकासही वेगाने होणार आहे. शाश्वत ऊर्जा, तंत्रज्ञान आणि उत्पादन क्षेत्रात होणारी ही गुंतवणूक राज्याच्या औद्योगिक प्रगतीला नवी दिशा देणारी ठरणार आहे.

औद्योगिक विकासाला नवी गती

मुख्यमंत्री फडणवीस यांनी गुंतवणूकदारांना आवाहन करताना सांगितले की, "महाराष्ट्रात गुंतवणूक करू इच्छिणाऱ्या प्रत्येक उद्योग समूहाला सरकार पूर्ण सहकार्य देईल. राज्य औद्योगिक क्रांतीकडे वाटचाल करत आहे." एकूणच, या भव्य गुंतवणुकीमुळे महाराष्ट्र देशातील आघाडीचे औद्योगिक केंद्र म्हणून आणखी बळकट होणार असून रोजगारनिर्मितीच्या दृष्टीनेही हा महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

जन सम्राट टाईम्स | विशेष बातमी

महाराष्ट्रात 23 जिल्ह्यांना उष्णतेचा इशारा!

तापमान वाढीने नागरिक हैराण

जन सम्राट टाईम्स

मुंबई : महाराष्ट्रात वाढत्या तापमानामुळे उष्णतेचा कहर तीव्र होत असून, हवामान विभागाने 17 एप्रिल रोजी राज्यातील तब्बल 23 जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. आगामी काही दिवसांत तापमान उच्चांक गाठण्याची शक्यता वर्तविण्यात आल्याने नागरिकांमध्ये चिंता वाढली आहे. हवामान खात्याने नागरिकांना विशेषतः दुपारी 1 ते 4 या वेळेत घराबाहेर पडणे टाळण्याचे आवाहन केले आहे. वाढत्या उष्णतेमुळे आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात, त्यामुळे आवश्यक ती खबरदारी घेण्याचेही सांगण्यात आले आहे. या 23 जिल्ह्यांना उष्णतेचा इशारा कोकण किनारपट्टीसह राज्यातील अनेक भागांना उष्णतेच्या लाटेचा फटका बसणार आहे. पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी यांसह धुळे, जळगाव, नाशिक, अहिल्यानगर, सातारा, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, अकोला, अमरावती, बुलढाणा, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यांचा यात समावेश आहे. दोन जिल्ह्यांत वादळी पावसाची शक्यता उष्णतेसोबतच वातावरणात अचानक बदल होण्याची शक्यता देखील वर्तवण्यात आली आहे. सांगली आणि सोलापूर या जिल्ह्यांमध्ये संध्याकाळच्या सुमारास ढगांच्या गडगडाटासह विजांच्या कडकडाटात वादळी पाऊस पडू शकतो. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. 18 एप्रिलपासून काहीसा दिलासा 18 एप्रिलपासून काही भागात तापमानात किंचित घट होण्याची शक्यता आहे. मात्र जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, अकोला, अमरावती, नागपूर आणि वर्धा या 10 जिल्ह्यांना उष्णतेचा 'यलो अलर्ट' कायम राहणार आहे. त्याचबरोबर सोलापूर, हिंगोली, नांदेड आणि धाराशिव येथे विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता असून, 30 ते 40 किमी प्रतितास वेगाने वारे वाहू शकतात.

19-20 एप्रिलला वातावरणात बदल

19 एप्रिल रोजी राज्यातील बहुतांश भागात हवामानात बदल होण्याचा अंदाज आहे. अकोला आणि अमरावती येथे उष्णतेची लाट कायम राहील, तर धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, सोलापूर, नांदेड, लातूर आणि धाराशिव या जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

शॉर्ट सर्किटमुळे पिकाला आग; शेतकऱ्याचे नुकसान

धरणगाव तालुक्यातील वंजारी येथे घटना

जन सम्राट टाईम्स

धरणगाव : शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाल्याची घटना आज दुपारी घडली. या आगीत सुमारे ८० आर क्षेत्रातील उभे मक्याचे पीक पूर्णतः जळून खाक झाले असून शेतकऱ्याला मोठा आर्थिक फटका बसला आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, येथील शेतकरी पुरुषोत्तम शंकर चौधरी यांच्या गट क्रमांक ३९/२ मधील शेतात दुपारी दीड ते दोन वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागली. वीज वाहिनीत झालेल्या शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. काही क्षणांतच आगीने भीषण रूप धारण केले आणि संपूर्ण मका पीक आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. घटनेची माहिती मिळताच प्रशासनाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तलाठी इफ्तार देशमुख यांनी घटनास्थळी पाहणी करून पंचनामा केला असून नुकसानाचा अहवाल तयार करण्यात आला आहे. या आगीत मक्याच्या पिकाचे १०० टक्के नुकसान झाल्याचे स्पष्ट झाले आहे.या वेळी एमएसईबीचे स्थानिक कर्मचारी तसेच गावातील नागरिक तुषार यशवंत चौधरी, ताराचंद अशोक महाजन, नामदेव पांडुरंग पाटील, शंकर भगवान पाटील आणि शांताराम जगन्नाथ महाजन यांनी घटनास्थळी उपस्थित राहून परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, वीज वाहिन्यांमधील शॉर्ट सर्किटमुळे शेतीपिकांचे नुकसान होण्याच्या घटना परिसरात वारंवार घडत असल्याचे समोर येत आहे.

आर्थिक मदत देण्याची मागणी

या घटनेनंतर पीडित शेतकऱ्यास शासनाकडून तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत असून, प्रशासनाने लवकरात लवकर मदतीची कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

टीसीएस छळ प्रकरण : रझा मेमनला पोलीस कोठडी

जन सम्राट टाईम्स

नाशिक – टीसीएस बहुराष्ट्रीय कंपनीतील विनयभंग, अश्लील टिप्पणी प्रकरणी दाखल गुन्ह्यात संशयित शफी शेख आणि रझा मेमन यांना न्यायालयाने १८ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. संशयितांवर याच प्रकरणात आणखी काही गुन्हे दाखल आहेत.हुराष्ट्रीय कंपनीत विनयभंग आणि धार्मिक सक्ती केल्याच्या आरोपाखाली अटकेत असलेल्या संशयितांच्या मोबाईल तपासातून या रॅकेटमधील इतर गुन्हे आणि सहभागाचा उलगडा होण्याची शक्यता सरकारी वकिलांनी व्यक्त केली आहे. प्रसिध्द अशा टीसीएस कंपनीत मागील चार वर्षांत महिलांवर अन्याय, अत्याचार, धर्मांतराचा प्रयत्न, मांसाहार करायला भाग पाडणे, विशिष्ट प्रार्थना व उपवास करायला लावणे आदी प्रकार घडल्याचे उघड झाले. या प्रकरणी आठ जणांविरुद्ध नऊ स्वतंत्र गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणात दानिश शेख (३१) तौफिख अत्तार (३४), शाहरूख हुसैन कुरैशी (३४) रझा मेमन (३५), असिफ अन्सारी, शफी शेख आणि अश्विनी चैनानी (५१, लुलानगर, पुणे) यांना अटक झाली आहे. सध्या हे संशयित न्यायालयीन कोठडीत आहेत. यातील संशयित निदा खान मात्र अजूनही पोलिसांच्या हाती लागलेली नाही. कारागृहात असणाऱ्या शफी शेख आणि रझा मेमन या दोघांना पीडितेशी शारीरिक जवळीक निर्माण करण्याच्या गुन्ह्यात अटक झाली आहे. टीसीएस प्रकरणात धर्मांतरासाठी कट्टरतावादी संघटनांकडून आर्थिक बळ? शफीने प्रेमाचा प्रस्ताव ठेवला. तर रजा मेमनने तक्रारदाराच्या शरीरावर अश्लील टिप्पणी केली. हे दोघे संशयित पीडितेशी अंगलट करायचे, असे तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणात दोघांना न्यायालयात हजर करण्यात आले.संशयितांची गुन्हा पद्धत जरी एकसारखी असली तरी पीडिता या वेगवेगळ्या आहेत. गुन्ह्याचा कालावधी आणि हकीकत वेगवेगळी आहे. तसेच संशयित रजाविरुद्ध तीन आणि शफीविरुद्ध चार गुन्हे दाखल आहेत. संशयिताचा भ्रमणध्वनी जप्त झाल्यानंतर आणखी काही गुन्हे अथवा इतर संशयितांचा सहभाग निष्पन्न होऊ शकतो. त्यामुळे त्यांना सहानुभूती न दाखवता पोलीस कोठडी देण्याची मागणी बेंढभर यांनी केली. न्यायालयाने दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकून संशयितांना १८ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

कोकण कन्या एक्सप्रेसमध्ये एसी अटेंडंटकडून अवैध मद्यसाठा जप्त

जन सम्राट टाईम्स

मुंबई : कोकण रेल्वे मार्गावरील गाड्यांमध्ये सुरू असलेल्या नियमित तपासणीदरम्यान 'कोकण कन्या एक्सप्रेस' (गाडी क्र. ११००४) मध्ये अवैध मद्यसाठा आढळून आल्याची घटना उघडकीस आली आहे.

विशेष म्हणजे या प्रकरणात एसी कोच अटेंडंटचाच सहभाग समोर आल्याने रेल्वे प्रशासनात खळबळ उडाली आहे. रत्नागिरी स्थानकावर रेल्वे सुरक्षा दल (आरपीएफ) आणि सी अँड आय विभागाच्या पथकाकडून तपासणी सुरू असताना संशयावरून संबंधित अटेंडंटची झडती घेण्यात आली. या झडतीत त्याच्याकडून बेकायदेशीरीत्या वाहतूक करण्यात येणाऱ्या तब्बल ३५ दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. रेल्वे कर्मचाऱ्याचाच अशा प्रकारच्या गैरप्रकारात सहभाग आढळल्याने प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेतली असून पुढील चौकशी सुरू करण्यात आली आहे.एसी कोच अटेंडंटचाच सहभाग समोर आल्याने रेल्वे प्रशासनात खळबळ उडाली आहे.

प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि रेल्वे प्रवास सुरळीत पार पडावा यासाठी अशा कारवाया सातत्याने सुरू ठेवण्यात येणार असल्याचे आरपीएफकडून स्पष्ट करण्यात आले.दरम्यान, प्रवाशांनी प्रतिबंधित वस्तू सोबत बाळगू नयेत तसेच संशयास्पद हालचालींबाबत तत्काळ रेल्वे प्रशासनाला कळवून सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे. संबंधित अटेंडंटविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

एसएसपीई ग्रस्त रुग्णांसाठी विशेष योजनाच नाही

राज्य सरकारची उच्च न्यायालयात माहिती

जन सम्राट टाईम्स

मुंबई : सबॲक्युट स्क्लेरोसिंग पॅनएनसेफलायटिस' म्हणजेच एसएसपीई या अतिशय जीवघेण्या आणि दुर्मीळ आजाराने ग्रस्त रुग्णांसाठी कोणतीही विशेष योजना नसल्याची माहिती राज्य सरकारने गुरुवारी उच्च न्यायालयात दिली. महादू बेलकर या व्यावसायिकाने या रुग्णांसाठी विशेष योजनाच नसल्याचा मुद्दा जनहित याचिकेद्वारे उपस्थित केला आहे. तसेच ही योजना आखण्याचे आदेश देण्याची मागणी केली आहे. मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठापुढे गुरुवारी या याचिकेवर सुनावणी झाली. त्यावेळी, एसएसपीई या आजाराचा "दुर्मीळ आजार"मध्ये समावेश करण्यात यावा, अशी मागणी राज्य सरकारने जुलै २०२५ मध्ये केंद्र सरकारकडे पत्र पाठवून करण्यात आल्याचे अतिरिक्त सरकारी वकील ओमकार चांदूरकर यांनी न्यायालयाला सांगितले. न्यायालयाने त्याची दखल घेऊन प्रकरणाची सुनावणी शुक्रवारी ठेवली. तसेच, केंद्र सरकारला याबाबत भूमिका स्पष्ट करण्यास सांगितले. या विशिष्ट आजाराबद्दल संबंधित अधिकाऱ्यांना संशोधन सुरू करण्याचे, बाधित कुटुंबांना आर्थिक मदत पुरवण्याचे आणि उपचार व देखभालीसाठी एक सर्वसमावेशक धोरण तयार

करण्याचे आदेश देण्याची मागणी बेलकर यांनी याचिकेतून केली आहे. याचिकाकर्त्यांनी गेल्या महिन्यात स्वतःचे मूल या दुर्मीळ आजाराने गमावल्याचे वकील कौशिक ताम्हाणे यांनी न्यायालयाला सांगितले. तसेच सध्या अस्तित्वात असलेल्या राष्ट्रीय योजनांतर्गत काही विशिष्ट लाभ उपलब्ध होण्याकरिता एसएसपीईचाही त्यात समावेश करावा या मागणीसाठी सरकारकडे एक निवेदन सादर करण्यात आल्याचेही त्यांनी न्यायालयाला सांगितले.सबअक्यूट स्क्लेरोसिंग पॅनएनसेफलायटीस म्हणजेच एसएसपीई हा मेंदूमध्ये गोवरच्या विषाणूच्या दीर्घकाळ टिकणाऱ्या, उत्परिवर्तित संसर्गामुळे होणारा एक दुर्मीळ आणि प्राणघातक आजार आहे. हा आजार सुरुवातीच्या गोवर संसर्गानंतर होतो. विशेषतः वयाच्या दुसऱ्या वर्षापूर्वी मुलांना गोवर झाला असेल, तर त्यांच्या वर्तणुकीत गंभीर बदल होतात. बौद्धिक क्षमतेत घट होऊन मायोक्लोनिक झटके येतात. या आजारावर तूर्त तरी कोणताही उपाय नाही आणि निदान झाल्यापासून १-३ वर्षांच्या आत हा आजार प्राणघातक ठरतो. हा सर्वांना होतो असेही नाही.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

आरक्षणाला पाठिंबा, फेररचनेला विरोध ; मंजुरीसाठी मतदान

बहुमताच्या जुळवाजुळवीसाठी केंद्र सरकारला कसरत करावी लागणार

जन सम्राट टाईम्स

महिला आरक्षणाला आमचा पाठिंबाच आहे, पण जनगणना न करता घाईघाईने लोकसभेच्या मतदारसंघांची फेररचना करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाला आम्ही तीव्र विरोध करत आहोत, अशी नि:संदिग्ध भूमिका 'इंडिया' आघाडीतील घटक पक्षांनी एकजुटीने घेतल्यामुळे गुरुवारी लोकसभेमध्ये केंद्र सरकारला घटनादुरुस्ती विधेयकावर भावनिक बचाव करावा लागला.

शुक्रवारी दुपारी ४ वाजता विधेयकांवर मंजुरीसाठी मतदान होणार असून दोनतृतीयांश बहुमताच्या जुळवाजुळवीसाठी केंद्र सरकारला कसरत करावी लागणार असल्याचे चित्र निर्माण झाले. महिला आरक्षणाची तरतूद लोकसभेच्या मतदारसंघांच्या फेररचनेशी जोडणारे घटनादुरुस्ती विधेयक, या फेररचनेसाठी आयोग नेमणारे विधेयक व केंद्रशासित प्रदेशांमध्येही या तरतुदीची अंमलबजावणी करणारे विधेयक अशी तीनही विधेयके लोकसभेत गुरुवारी एकत्रितपणे मांडली गेली. ही विधेयके मांडण्याला विरोधकांनी विरोध केला. २०२३ मध्ये महिला आरक्षण कायदा झाला असताना पुन्हा हे विधेयक कशासाठी आणले जात आहे? या आरक्षणाशी मतदारसंघांच्या फेररचना जोडून भाजपला राजकीय फायदा मिळवायचा आहे, या भाजपच्या राजकीय हितसंबंधांना आम्ही विरोध करत आहोत, असा मुद्दा काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, समाजवादी पक्ष, द्रमुक, 'एमआयएम', 'माकप' आदी प्रमुख विरोधी पक्षांच्या सदस्यांनी उपस्थित केला.महिला आरक्षणाला आमचा विरोध नाही. त्याची अंमलबजावणी तात्काळ करू शकता. पण मतदारसंघांच्या फेररचनेचा समावेश का, कशासाठी करत आहात? त्यावर सविस्तर चर्चा होणे आवश्यक आहे.

मात्र, केंद्र सरकार हा संपूर्ण विषय अवघ्या २-३ दिवसांतच उरकत आहे. या संदर्भात विशेषत: दक्षिणेकडील राज्यांचे अनेक गंभीर प्रश्न आहेत. जर सरकारला महिला आरक्षण खरोखरच लागू करायचे असते, तर त्यांनी ते २०२३ मध्येच केले असते. त्यांनी ते आताही करावे, आम्ही त्यांना नक्की पाठिंबा देऊ, असा मुद्दा काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी उपस्थित केला. विरोधकांकडून २०२३ मध्येच महिला आरक्षण कायदा झाला असताना तीन वर्षांत या आरक्षणाची अंमलबजावणी का केली नाही, असा प्रश्न उपस्थित केला.

आरक्षण आत्ताही लागू करा -थरूर

काँग्रेसचे खासदार गौरव गोगोई म्हणाले की, मल्लिकार्जुन खरगेंनी तेव्हाच केंद्र सरकारकडे मागणी केली होती की, महिला आरक्षण २०२९ लाच लागू करा, त्यासाठी जनगणनेसाठी थांबू नका. पण तेव्हा मात्र केंद्र सरकारने जनगणनेला प्राधान्य दिले होते. मग आता असे काय झाले की केंद्र सरकार घूमजाव करत घाईघाईत हे आरक्षण लागू करू पाहात आहे? आम्ही (विरोधकांनी) महिला आरक्षणाला पाठिंबा दिला होता व सर्वसंमतीने विधेयक मंजूरही झाले होते. हे आरक्षण अजूनही अस्तित्वात आहे, त्याची अंमलबजावणी करा असे आवाहनही गोगोई यांनी केले.

सरकारी कर्मचाऱ्यांना आता मिळणार मोठी घरे!

जन सम्राट टाईम्स

मुंबई : सरकारी कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांच्या संरचनेत तब्बल २२ वर्षांनंतर बदल करण्याचा निर्णय राज्य सरकारकडून घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार सरकारी कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या घरांचे क्षेत्रफळात १०० चौरस फुटांपासून ते ७०० चौरस फुटांपर्यंत वाढ झाली आहे. सनदी अधिकाऱ्यांच्या घरांचे क्षेत्रफळ हे २५०० चौरस फूट तर सर्वात कमी वेतनगटाचे घर ४५० चौरस फुटांपर्यंत करण्यात आले आहे. यामध्ये देवघरापासून ते कार्यालय कक्ष, प्रवेशद्वार कक्षांचाही समावेश करण्यात आला आहे. सरकारी कर्मचाऱ्यांच्या घरांसाठी विविध वेतनगटांनुसार शासकीय कर्मचारी निवासस्थानांचे चटईक्षेत्रफळ २००४ साली निश्चित करण्यात आले होते. मात्र मागील २२ वर्षांत राहणीमानात झालेले बदल, वाढलेल्या गरजा, जीवनमानातील बदल तसेच नवीन बांधकाम तंत्रज्ञान या सर्वांचा विचार करून या घरांच्या संरचनेत बदल करण्याचा निर्णय सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडून घेण्यात आला. त्यानुसार या घरांची संरचना आणि क्षेत्रफळ ठरविण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय समिती नेमण्यात आली होती. या समितीने सातव्या वेतन आयोगानुसार विविध वेतनगटांनुसार घरांची संरचाना आणि क्षेत्रफळ निश्चित केले आहे. सध्या असलेली शासकीय निवासस्थाने १८०० चौरस फुटांपासून ते ३४० चौरस फुट क्षेत्रफळापर्यंत मर्यादित आहेत.

Selected

ठाण्यात मोठी कारवाई; बहुराष्ट्रीय कंपनीवर कारवाईचा बडगा

मुंबई : ठाण्यातील कोपरी पोलिस ठाण्याच्या हद्दीत शिधावाटप भरारी पथक आणि पोलिसांनी केलेल्या संयुक्त कारवाईत २० हजार लिटर डिझेल सदृश अवैध पेट्रोलियम पदार्थासह टँकर जप्त करण्यात आला. सुमारे ५३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी एकाला ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिधावाटप विभागाच्या वतीने देण्यात आलेल्या माहितीनुसार, गुरुवारी मध्यरात्री एक टँकर कोणत्याही वैध कागदपत्रांशिवाय मोठ्या प्रमाणात डिझेल सदृश पेट्रोलियम पदार्थाची बेकायदा वाहतूक करत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार उपनियंत्रक शिधावाटप आणि कोपरी पोलिसांनी संयुक्त कारवाई करून संबंधित टँकर अडविला. त्यामध्ये सुमारे २० हजार लिटर इतका बेकायदा पेट्रोलियम साठा आढळून आला. टँकरसह संपूर्ण साठा जप्त करण्यात आला. या बाबत एका व्यक्तीला ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.नियंत्रक शिधावाटप कार्यालयाने ठाण्यातील वंडर मॉल परिसरातील डोमिनोज पिझ्झा स्टोअरवर धाड टाकून ४.५९ लाख रुपयांचा सिलेंडर साठा जप्त केला आहे. स्टोअरच्या तळघरात विविध तेल कंपन्यांचे गॅस सिलेंडर मोठ्या प्रमाणात साठवून ठेवलेले आढळले. एचपीसीएल, बीपीसीएल, आयओसी आणि गो गॅस कंपनीचे एकूण १४० सिलिंडर जप्त करण्यात आले. त्यापैकी ५५ सिलिंडर भरलेले तर ८५ सिलिंडर रिकामे होते. संबंधितांविरुद्ध जीवनावश्यक वस्तू कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एकही मतदार वंचित राहणार नाही!

जीपीएस मित्रपरिवाराचा धडाकेबाज उपक्रम; २,५०० नागरिकांची नोंदणी

जन सम्राट टाईम्स

पाळधी (जळगांव) : मतदार हक्काबाबत जागरूकता निर्माण करत “एकही मतदार वंचित राहू नये” हा ठाम निर्धार प्रत्यक्ष कृतीत उतरवत जीपीएस मित्रपरिवाराने राबवलेला मतदार मॅपिंग SIR कॅम्प गावात अक्षरशः लोकचळवळ ठरला. पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील आणि जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या उपक्रमाने मतदानाबाबतची उदासीनता झटकून टाकत नागरिकांना नवसंजीवनी दिली आहे. या कॅम्पमध्ये तब्बल २,५०० नागरिकांचे मतदार मॅपिंग पूर्ण करण्यात आले असून, ही संख्या गावाच्या इतिहासातील विक्रमी मानली जात आहे. अनेक वर्षांपासून विविध कारणांमुळे मतदान हक्कापासून वंचित राहिलेल्या नागरिकांना या उपक्रमामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. आगामी निवडणुकांमध्ये एकही मतदार वंचित राहू नये, यासाठी हा कॅम्प अत्यंत निर्णायक ठरणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

विशेष म्हणजे, जीपीएस मित्रपरिवाराने केवळ औपचारिक कॅम्प न भरवता घराघरात जाऊन जनसंपर्क साधला. मागील काही दिवस गावभर दवंडी देत, गल्लीबोळांत फिरून नागरिकांना मतदान प्रक्रियेबाबत माहिती देण्यात आली. सोशल मीडियाचाही प्रभावी वापर करत तरुणाईला या मोहिमेशी जोडण्यात आले. या मोहिमेत प्रतापराव पाटील स्वतः मैदानात उतरून नागरिकांशी थेट संवाद साधताना दिसले, ज्यामुळे उपक्रमाला अधिक विश्वासार्हता आणि बळ मिळाले. या संपूर्ण प्रक्रियेत बीएलओ, शिक्षक, उपशिक्षक, शासकीय कर्मचारी आणि बीएलए यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सर्व घटकांनी एकजुटीने काम केल्यामुळे हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपली नावे मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला.

उपक्रमाचे सर्व स्तरांतून जोरदार कौतुक

या उपक्रमाचा परिणाम केवळ मतदान प्रक्रियेपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे व नोंदणी प्रक्रिया देखील सुलभ झाली आहे. त्यामुळे गावात समाधान आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. “प्रत्येक मतदार सुरक्षित – प्रत्येक बूथ मजबूत” हा संदेश आता प्रत्यक्षात उतरवण्यात जीपीएस मित्रपरिवार यशस्वी ठरला आहे. भविष्यातही असेच लोकाभिमुख, परिणामकारक आणि जनजागृती करणारे उपक्रम राबवले जातील, असा विश्वास व्यक्त होत असून या उपक्रमाचे सर्व स्तरांतून जोरदार कौतुक होत आहे.

विशेष बातमी

आठवडाभरात विजेच्या मागणीत मोठी वाढ

मुंबईत १५ ते १७ टक्के वाढ

जन सम्राट टाईम्स

मुंबई :उन्हाच्या तप्त झळा सुसह्य करणारी वातानुकूलित यंत्रणा, कुलर, पंखे यांचा वापर वाढल्याने मुंबईसह राज्यभरात विजेच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. मुंबईत तर अवघ्या आठवडाभरात वीजमागणीत १५ ते १७ टक्के इतकी वाढ नोंदवली गेली. उन्हाचा तडाखा कायम राहिल्यास विजेच्या मागणीत आणखी भर पडेल, असा अंदाज आहे. यंदा मार्च-एप्रिलमध्ये पाऱ्याने मोठी उसळी घेतल्याने मुंबईसह राज्यात विजेचा वापर वाढून अनेक नवीन विक्रम प्रस्थापित झाले. मार्चमध्येच विजेची मागणी ३० हजार मेगावॉटच्या पुढे नोंदवली गेली. तर मुंबईची दिवसाची मागणी सुमारे साडेतीन ते चार हजार मेगावॉटपर्यंत पोहोचली होती. तापमान जसजसे उतरू लागले तशी वीजेची मागणीही कमी झाली. मात्र आठवडाभरात राज्यभर तापमानाने मोठी उसळी घेतल्याने विजेची मागणीही वाढली आहे. मुंबईत ८ एप्रिलला सकाळच्या (दहा ते बारा वाजण्याच्या) सुमारास ३,४५९ मेगावॉट इतकी वीजमागणी होती. ती १५ एप्रिलला सुमारे १५ टक्क्यांनी (४,०६४ मेगावॉट) वाढली. सायंकाळपर्यंत वीजमागणीतील वाढ ५ ते ७ टक्क्यांपर्यंत खाली आली. मात्र पहाटे चारच्या सुमारास पुन्हा १७ टक्के इतकी वीजमागणी वाढ नोंदवली गेली. राज्यात मुंबई वगळता इतरत्रही वीजमागणीत दिवसभरात ५ ते १० टक्के इतकी वृद्धी नोंदवली गेली. आठवडाभरापूर्वी राज्यभरात सकाळच्या सुमारास २२,९४२ मेगावॉट इतकी वीजमागणी होती.

पाच वर्षांत विक्रमी वाढ

साधारण पाच वर्षांपूर्वी एप्रिल व मे महिन्यांत राज्यातील वीजमागणी २१ हजार मेगावॉटच्या आसपास सीमित असे. तर मुंबईत ती २,२०० मेगावॉटदरम्यान असे. त्यात आता विक्रमी वाढ झाली आहे. राज्यात विजेच्या मागणीने ३० हजार मेगावॉटचा विक्रम प्रस्थापित केला आहे. तर २२ मे, २०२४ रोजी मुंबईत ४,३०६ मेगावॉट इतकी विक्रमी वीजमागणी नोंदवली गेली. गेल्या वर्षी तर ती ४,४४० मेगावॉटवर पोहोचली होती.

अपेक्षित बदल न झाल्यास १८ एप्रिल पासून आमरण उपोषण

जन सम्राट टाईम्स

मुंबई : ॲप-आधारित कंपन्यांच्या मनमानी कारभाराच्या निषेधार्थ गुरुवारी ॲप-आधारित कंपन्यांसोबत परिवहन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चर्चा केली. ॲपमध्ये १७ एप्रिल रोजी जर अपेक्षित बदल झाले नाहीत, तर १८ एप्रिल पासून तीन कॅब चालक आझाद मैदान येथे आमरण उपोषण करणार आहेत.ॲप-आधारित कंपन्यांच्या मनमानी कारभाराच्या निषेधार्थ पुणे येथून १० एप्रिल रोजी तीन कॅब चालकांनी सुरू केलेली पायी पदयात्रा १५ एप्रिल रोजी आजाद मैदान येथे पोहोचली. तीन चालक १६ एप्रिलपासून उपोषण करणार होते. मात्र परिवहन विभागाकडून शुक्रवारी कंपन्याशी चर्चा करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. त्यामुळे कॅब चालकांनी उपोषण स्थगित केले आहे.या बैठकीत ॲप-आधारित कॅब सेवांना सरकारमान्य दर लागू करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

शीव (सायन) रेल्वे उड्डाणपुलाच्या पुनर्बांधणीचे काम १५ जुलैपर्यंत पूर्ण करा

जन सम्राट टाईम्स

मुंबई : शीव पूर्व – पश्चिम भागांना जोडणा-या शीव (सायन) रेल्वे उड्डाणपुलाच्या पुनर्बांधणीचे काम १५ जुलैपर्यंत पूर्ण करावे असे निर्देश पालिका आयुक्त आश्विनी भिडे यांनी दिले आहेत. तसेच रस्ते काँक्रिटीकरण कामे करताना गुणवत्तेला प्राधान्य द्यावे. तसेच ३० एप्रिल २०२६ नंतर कोणतेही नवीन खोदकाम हाती घेऊ नये. काँक्रिट ओतण्याची कामे १५ मेपर्यंत पूर्ण करावी. तसेच, रस्त्यांची सर्व कामे दिनांक ३१ मेपर्यंत पूर्ण करुन रस्ते वाहतुकीस खुले करावेत, असे विविध निर्देश महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी दिले आहेत. महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी गुरुवारी शहर विभागातील विविध विकास कामांची प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. त्यात धारावी येथील ४१८ दशलक्ष लीटर प्रतिदिन क्षमतेचे मलजल प्रक्रिया केंद्र, शीव (सायन) येथील रेल्वेमार्गावरील उड्डाणपूल, शीव येथील रस्ते सिमेंट काँक्रिटीकरण कामे, चुनाभट्टी रेल्वे स्थानक परिसरात पावसाचे पाणी साचू नये म्हणून पर्जन्य जलवाहिन्या विभागाने केलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना आदींचा समावेश आहे. या पाहणीवेळी त्यांनी विविध आदेश दिले. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अभिजीत बांगर यावेळी उपस्थित होते.

ब्रेक न्यूज

शेतकऱ्यांना दिलासा

पीकविमा योजनेतून भरपाई मंजूर

जन सम्राट टाईम्स

मुंबई : यंदाच्या खरीप हंगामात झालेल्या पीक नुकसानीपोटी पात्र विमा लाभार्थ्यांना १,२१९.७८ कोटी रुपयांची भरपाई मंजूर झाली आहे. प्रामुख्याने सोयाबीन पिकाच्या नुकसानीपोटी मदत मंजूर झाली आहे. नांदेड जिल्ह्याला सर्वाधिक ८०० कोटी रुपयांची मदत मिळणार आहे. कापूस आणि तूर पिकांच्या नुकसानीचे आकडेवारी अद्याप अंतिम झाली नाही.

फसलेली पीकविमा योजना योजना यंदाही जैसे-थे ? असे वृत्त लोकसत्तामध्ये गुरुवारी प्रकाशित झाले होते. राज्यात मागील खरीप हंगामात अतिवृष्टी, अवकाळी आणि महापुरामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन ही पीकविमा योजनेतून शेतकऱ्यांना अद्याप एक रुपयाही मिळाला नसल्याचे समोर आले होते.

या वृत्ताची तातडीने दखल घेऊन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी तातडीने विमा भरपाई मंजुरीचे आदेश दिले होते. त्यानुसार ज्या महसूल मंडळातील पीक कापणी प्रयोग पूर्ण झाले आहेत आणि त्या बाबत तक्रारी नाहीत, असे विमा दावे तातडीने मंजूर करण्यात आले आहेत. त्यानुसार पहिल्या टप्प्यात सोयाबीन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई मिळणार आहे. एकूण ५८ लाख ९० हजार हेक्टर क्षेत्राचा विमा काढण्यात आला होता, त्यात ३६ लाख हेक्टरवरील सोयाबीन पिकाचा समावेश होता.कापूस आणि तुरीची काढणी फेब्रुवारी महिन्यात होते. पीक कापणी प्रयोगाचे अहवाल एप्रिलअखेर केंद्र सरकारच्या संकेतस्थळावर अपलोड केले .जाणार आहेत, त्यानंतर संबंधित दावे मंजूर होऊन भरपाई रक्कम मंजूर होईल.

नांदेडला जिल्ह्याला सर्वाधिक 800 कोटी

नांदेड जिल्ह्याला मंजूर विमा भरपाईचा सर्वाधिक फायदा होणार आहे. १२१९ कोटींपैकी तब्बल ८०० कोटी रुपये नांदेडमधील शेतकऱ्यांना मिळणार आहेत. धर्माबाद तालुक्यातील जरीकोट महसूल मंडलात प्रति हेक्टर ३५,३११ रुपये मंजूर झाले आहेत. प्रत्येक महसूल मंडलात उंबरठा उत्पादनाच्या तुलनेत ज्या प्रमाणात सरासरी उत्पादन कमी आले आहे, त्या प्रमाणात नुकसान भरपाई निश्चित होते.

द जॉब ट्रेनिंगमुळे विद्यार्थिनींच्या करिअरला नवी दिशा; प्रशिक्षणातून थेट रोजगार संधी

जन सम्राट टाईम्स

मुंबई (गुरुदत्त वाकदेकर): सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम. पी. शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महिला महाविद्यालयात तृतीय वर्षातील विद्यार्थिनींना महाविद्यालयीन शिक्षणासोबतच नवीन शिक्षण प्रणाली अंतर्गत प्रत्यक्ष कामाचा अनुभव देणाऱ्या ऑन द जॉब ट्रेनिंग (ओजेटी) या उपक्रमामुळे विद्यार्थिनींच्या करिअरला नवी दिशा मिळत असून, अनेक विद्यार्थिनींना प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर उत्कृष्ट नोकरीच्या संधी प्राप्त झाल्याची आनंददायी बाब समोर आली आहे. शैक्षणिक ज्ञानाबरोबरच कौशल्य विकासावर भर देणाऱ्या या उपक्रमामुळे विद्यार्थिनींच्या आत्मविश्वासात लक्षणीय वाढ झाली आहे. महाविद्यालयाच्या सर्व विभागांच्या पुढाकारातून आणि विविध संस्थांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. या अंतर्गत विद्यार्थिनी विविध शाळा, कार्यालये, प्रसार माध्यमे, स्वयंसेवी संस्था आणि उद्योग क्षेत्रात जाऊन १०० तासांचे प्रशिक्षण पूर्ण करतात. या प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थिनींना केवळ कामाची ओळखच नाही, तर जबाबदारी, वेळेचे व्यवस्थापन, संवाद कौशल्य आणि समस्या सोडविण्याची क्षमता यांसारखी जीवनावश्यक कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळाली. या प्रशिक्षणाचा सर्वात सकारात्मक परिणाम म्हणजे अनेक विद्यार्थिनी

प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्याच संस्थांमध्ये नोकरीची संधी मिळाली. मराठी विभागातील आठ विद्यार्थिनींनी रिटेल सेल्स असोसिएट ट्रेनिंग प्रोग्राम या प्रकल्पात ग्राहकांशी व्यावसायिक संवाद व विक्री कौशल्याचे प्रशिक्षण (ओजेटी) अंतर्गत पूर्ण केले. त्यानंतर त्यांना सेन्को गोल्ड अँड डायमंड्स, कॅरेटलेन, तनिष्क, त्रिभुवनदास भीमजी झवेरी आणि तनिष्क यांसारख्या नावाजलेल्या दागिन्यांच्या दुकानांमध्ये नोकरीची संधी मिळाली. हे विशेष प्रशिक्षण जीईएमएस कार्यक्रम (जेम्स कार्यक्रम) हा इंटरनॅशनल जेमोलॉजिकल इन्स्टिट्यूट (आयजीआय) यांचा सीएसआर (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) उपक्रम असून, ॲसेट्झ सोशल रिस्पॉन्सिबिलिटी असोसिएशन (एएसआरए) यांच्या माध्यमातून याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थिनींना कौशल्याधारित प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम बनवणे हा आहे. या उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थिनींनी आपल्या अनुभवांविषयी सांगताना म्हटले की, “पुस्तकी ज्ञानापेक्षा प्रत्यक्ष काम करताना मिळणारा अनुभव खूप वेगळा असतो. सुरुवातीला थोडी भीती वाटत होती, पण हळूहळू आत्मविश्वास वाढला. शिक्षक आणि संस्थेतील मार्गदर्शकांनी दिलेल्या मार्गदर्शनामुळे आम्ही काम व्यवस्थित शिकू शकलो.” विद्यार्थिनींच्या कामातील प्रामाणिकपणा, वेळेचे पालन आणि कार्यक्षमता पाहून संबंधित संस्थांनी त्यांना कायमस्वरूपी नोकरी देण्याचा निर्णय घेतला आहे. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अर्चना पत्की यांनी सांगितले की, “ओजेटी हा उपक्रम विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. यामुळे विद्यार्थिनींना केवळ नोकरी मिळविण्यास मदत होत नाही, तर त्यांना जबाबदार नागरिक बनण्याची प्रेरणाही मिळते. भविष्यातही अशा उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप देण्याचा आमचा प्रयत्न असेल.” तसेच सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संस्थेच्या प्रमुखांनीही या उपक्रमाचे कौतुक करत म्हटले की, विद्यार्थिनींमध्ये काम करण्याची तयारी आणि शिकण्याची वृत्ती अत्यंत सकारात्मक आहे.

आरसीबीची एलएसजीवर ५ गडी राखून दमदार मात

जन सम्राट टाईम्स

मुंबई : आयपीएल २०२६ मधील २३व्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने लखनौ सुपर जायंट्सवर ५ गडी राखून प्रभावी विजय मिळवत गुणतालिकेत आपली स्थिती अधिक भक्कम केली. एम. चिन्नास्वामी स्टेडियम, बेंगळुरू येथे झालेल्या या सामन्यात लखनौने २० षटकांत १४६/१० धावा केल्या. प्रत्युत्तरात आरसीबीने १५.१ षटकांत १४९/५ धावा करत विजय मिळवला. लखनौची सुरुवात संमिश्र झाली. मिचेल मार्शने ४० धावांची संयमी खेळी करत डाव सावरण्याचा प्रयत्न केला. आयुष बदोनीने ३८ धावा करत मधल्या फळीत प्रतिकार केला. मात्र नियमित अंतराने पडलेल्या विकेट्समुळे लखनौला मोठी भागीदारी उभारता आली नाही. भुवनेश्वर कुमार, रासिख दर सलाम आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी अचूक मारा करत लखनौला १४६ धावांवर रोखले. भुवनेश्वर कुमारने ३ बळी घेत लखनौच्या मधल्या फळीला हादरवले. रासिख दर सलामने ४ बळी घेत डावाचा कणा मोडला. क्रुनाल पंड्याने २ बळी मिळवत दबाव कायम ठेवला. टप्प्याटप्प्याने पडलेल्या विकेट्समुळे लखनौचा डाव शेवटपर्यंत सावरू शकला नाही. १४७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना आरसीबीची सुरुवात संथ झाली. फिल सॉल्ट लवकर बाद झाला. त्यानंतर विराट कोहलीने ४९ धावांची महत्त्वपूर्ण खेळी करत डाव स्थिर केला. रजत पाटीदारने २७ धावा करत वेग वाढवला. जितेश शर्मा आणि टिम डेव्हिड यांनी मधल्या षटकांत झटपट धावा करत सामना आरसीबीच्या बाजूने झुकवला. कोहली–पाटीदार भागीदारीने डावाला दिशा दिली. जितेश शर्माच्या आक्रमक फलंदाजीमुळे आवश्यक धावगती कमी होत गेली. शेवटी टिम डेव्हिड आणि रोमॅरियो शेफर्ड यांनी नाबाद राहत संघाला विजय मिळवून दिला. लखनौकडून प्रिन्स यादवने ३ बळी घेत प्रभाव टाकला. अवेश खानने २ बळी मिळवत प्रतिकार केला. मात्र शेवटच्या षटकांत आरसीबीने शांत डोके ठेवत सामना सहज जिंकला. या सामन्यात काही महत्त्वाचे विक्रम नोंदले गेले. रासिख दर सलामचा ४/२४ हा या हंगामातील लखनौविरुद्धचा सर्वात प्रभावी स्पेल ठरला. विराट कोहलीने सलग सामन्यांमध्ये स्थिर फलंदाजी करत संघाला मजबूत पाया दिला. या विजयामुळे आरसीबीने स्पर्धेत आपली स्थिती अधिक मजबूत केली असून प्लेऑफच्या शर्यतीत महत्त्वाची झेप घेतली आहे.

चेंबूर येथे भीमजयंतीनिमित्त महामानवाला शैक्षणिक मानवंदना

विद्यार्थ्यांसाठी आयोजित उपक्रमाला प्रतिसाद

जन सम्राट टाईम्स

मुंबई : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त चेंबूर शेल कॉलनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे महामानवाल शैक्षणिक मानवंदना हा उपक्रम राबविण्यात आला .सदर उपक्रमाला जनतेकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला जमा झालेले शैक्षणिक साहीत्य लवकरच आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना वितरीत केले जाणार असल्याची माहीती सामाजिक कार्यकर्ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक समितीचे अध्यक्ष व या उपक्रमाचे आयोजक रमेश मोकळ यांनी दिली.

भारतरत्न डॉ.बाबासाहैब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मुंबईसह देशभरात काल विविध उपक्रम तसेच मिरवणुका काढून साजरी करण्यात आली.चेंबूर शेलकॉलनी साईबाबा नगर,नाना नानी पार्क येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे एक वही, एक पेन अभियानांतर्गत महामानवाला 'शैक्षणिक मानवंदना' देण्याचे आवाहन येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेश मोकळ व सहका-यांनी केले होते. या उपक्रमांतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधान चौक येथील शिल्पाला अनेक मान्यवर व आंबेडकरी अनुयायांनी वह्या, पेन पुस्तकांची आदरांजली वाहून मानवंदना दिली.

नगरसेविका कु. कशिश राजेश फुलवारीया, माजी नगरसेवक श राजेश फुलवारीया,माजी नगरसेविका .वंदनाताई गौतम साबळे,काँग्रेस नेते सुभाष भालेराव,शिवसेना शाखा प्रमुख . राजू थोरात, मनसेचे सर्वश्री कृष्णा सोनी,सतीश नाडर, बालाजी नाडर, भाजपाचे सर्वश्री रामस्वरूप गोयल,छगन मौर्या, नवीन बुचिया,नित्यागजेंद्र नाडर, करण निरभवणे, नुपूर गुप्ता,आम आदमी पक्षाचे .अतनू मुखर्जी, रिपाईचे .नितीन कांबळे, कामगार नेते .लक्ष्मण साळवे,समाजसेवक रामवृक्ष चौधरी,श्रीनिवास नायडू,राहुल वाघमारे, अभिषेक कांबळे,आशिष आनंद,राजू गायकवाड,अमित खाडे,अरविंद सिंग, संजय पवार, सुभाष जैस्वार,हिरजी बगडा,विजय भद्रशेटे,छोटूराम कुडिया,ताराचंद पलिया,रतन कन्नर, संजय जगताप,जयश्री सातपुते, दिपेश हिरे, सुरेश जतन,राकेश कांबळे, शंकर साळुंखे, सचिन माने,नवीन जाधव, सुनील शिरसाट, कन्ना स्वामी,मुकेश सकट, रवींद्र मोकल, सुरेश मोकल, महेंद्र लव्हांडे, दिलीप चौधरी, प्रदीप खरे, प्रदीप जगताप,बॉबी पार्टे,अनिल कदम, अरविंद कांबळे, जलील शेख, बाबासाहेब लिहिणार, गणेश जावळे, सुरेश बगाडे, शैलेश कांबळे,संजय बेलकर,हे यावेळी उपस्थित होते. सदर उपक्रमांतर्गत जमा झालेले शैक्षणिक साहीत्य लवकरच समाजातील आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना वितरीत केले जाणारअसल्याचे मोकळ यांनी सांगितले.

अँकर न्यूज

झुरखेडा येथे सरपंचांचे आमरण उपोषण सुरू; शेतकऱ्यांचा उस्फूर्त प्रतिसाद

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेविरोधात आंदोलन; व्याज वसुली प्रकरणी संताप

जन सम्राट टाईम्स

धरणगाव/जळगाव, शेतकऱ्यांना न्याय मिळावा आणि झुरखेडा गावातील प्रलंबित प्रश्न तात्काळ मार्गी लावावेत, या मागण्यांसाठी झुरखेडा येथे लोकनियुक्त सरपंचांच्या नेतृत्वाखाली आजपासून आमरण उपोषणास सुरुवात करण्यात आली आहे. उपोषणाच्या पहिल्याच दिवशी गावासह परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आंदोलनाला उत्स्फूर्त पाठिंबा दर्शविला. हे उपोषण आज सकाळी १० वाजता झुरखेडा येथील स्वयंभू महादेव मंदिर परिसरात सुरू झाले असून, शेतकऱ्यांचा वाढता सहभाग लक्षवेधी ठरत आहे. बँकेवर गंभीर आरोप; व्याज वसुलीचा मुद्दा ऐरणीवर आंदोलनकर्त्यांनी जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर गंभीर आरोप करत म्हटले आहे की, शासनाच्या आदेशांचे उल्लंघन करून ‘छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना – २०१७’ अंतर्गत शेतकऱ्यांकडून बेकायदेशीर व्याज वसूल करण्यात आले. या प्रकरणी वारंवार शासनाकडे पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने अखेर उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे त्यांनी स्पष्ट केले.श्री. गुलाबराव बाबूराव देवकर यांच्यावरील आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाची सखोल चौकशी करून सहकार मंत्र्यांनी दिलेली स्थगिती तात्काळ उठवावी व दोषींवर कठोर कारवाई करावी. शेतकरी सन्मान योजनेअंतर्गत आकारण्यात आलेले व्याज तात्काळ परत करावे व भविष्यात कोणतेही व्याज आकारू नये. मागील सहा वर्षांपासून पीककर्ज न मिळाल्यामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यात यावी. विभागीय सहनिबंधक नाशिक संभाजी निकम यांच्यावर निष्काळजीपणा व कर्तव्यच्युतीबद्दल शिस्तभंगाची कारवाई करून बडतर्फ करावे.

परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण

या आंदोलनामुळे परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून प्रशासनाचे लक्ष या प्रश्नाकडे वेधले गेले आहे. विविध शेतकरी संघटनांकडून या आंदोलनाला वाढता पाठिंबा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.